**सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०.००१०६५-२०१९**

**नि.दि.दावा क्र. २७८/२०१९ मध्ये निशानी क्र.१२ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादीने त्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत स्विकारण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी/अर्जदाराचे असे कथन आहे की, तो शेतीच्या कामात व्यस्त असल्यामुळे त्याला आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे तो विहित वेळेत कैफियत दाखल करु शकला नाही. त्यास कैफियत दाखल करण्यास ३ महिने २६ दिवस विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्यामुळे त्यास लेखी कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे जरुरीचे आहे. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन जर त्याची कैफियत स्विकारली नाही तर त्याचे कशानेही भरुन न येणार नुकसान होणार आहे. त्यामुळे त्याने सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. वादीने अर्जास आक्षेप नोंदवुन कैफियत अर्जातील कारणे संयुक्तीक नसल्याचे कथन करुन प्रतिवादीचा अर्ज मुदतबाहय असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. उभय पक्षांच्या विद्धवान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. दावा मालकी हक्क घोषणेसाठी व निरंतर मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादीने विहित मुदतीत कैफियत दाखल न केल्यामुळे त्याच्याविरुध्द दिनांक १४.११.२०१९ रोजी ‘‘विना कैफियत ’’ प्रकरण चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी/अर्जदार यास दिनांक १२.०७.२०१९ रोजी समंसची बजावणी झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादीने हा अर्ज आज दिनांक ०७.०२.२०२० रोजी दाखल केला आहे. कायदयातील तरतूर्दीनुसार प्रतिवादी मुदतवाढीचा अर्ज दाखल केल्यास ९० दिवसांपर्यंतचा वेळ कैफियत दाखल करण्यासाठी दिला जावू शकतो. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, तिला सदरचा अर्ज दाखल करण्यास जवळपास ३ महिन्यांपेक्षा जास्तीचा विलंब झालेला आहे. जरी असले तरी दाव्यामध्ये स्थावर मिळकतीबाबत उभय पक्षाचे हक्क संबंध गुंतले असल्याचे दिसून येते. सदर

प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होण्यासाठी प्रतिवादी/ अर्जदारास त्याची कैफियत मांडण्यासाठी संधी देणे गरजेचे व न्यायोचित आहे. परंतू कैफियत दाखल करण्यासाठी प्रतिवादीकडून झालेला विलंब पाहता वादीला त्याबाबत खर्च देणे योग्य ठरेल. अशा परिस्थितीत वरील सर्व विवेचनावरुन न्यायाचा हेतू साध्य करण्यासाठी मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये २००/- इतक्या खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी/ अर्जदार याच्याविरुध्द झालेला दिनांक १४.११.२०१९ रोजीचा ''विना कैफियत'' आदेश रदद करण्यात येतो

३. प्रतिवादी/ अर्जदार यास वादीला पुढील तारखेपर्यंत अथवा न्यायालयाने वाढवुन दिलेल्या तारखेपर्यंत सदर अर्जाचा खर्च देणे बंधनकारक राहिल. तसा खर्च पुढील तारखेपर्यंत न दिल्यास सदरचा अर्ज आपोआप खारीज समजण्यात यावा.

Digitally signed by Babaso Sanjay Sankpal
Date: 2020.02.10 11:45:06 +0530

दिनांक ०७.०२.२०२० (बी. एस. संकपाळ)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज